# महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,

# नागरीकांची सनद, २०२५

## :- नोंदणीकृत कार्यालय -:

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादित**

**प्रशासकीय भवन, ४ था मजला, आर.सी.चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई – ४०० ०७१**

**फोन नं. ०२२- २५२७ ५३७४ / २५२९ ९६८५**

**वेबसाईट- www.msobcfdc.org ई-मेल – mdmsobcfdc@gmail.com**

## अ. सेवांचा तपशील

महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत इतर मागासवर्ग प्रवर्गातील पात्र व्यक्तींकरीता खालील कर्ज वाटपाच्या विविध योजना राबवून अल्प व्याज दराने स्वयंरोजगाराकरीता कर्ज पुरवठा करण्यात येतो. सदर योजनांबाबतचे माहिती पत्रक जिल्हा कार्यालय व मुख्यालयात उपलब्ध असून, समक्ष मागणी केल्यास अभ्यागतांना ते उपलब्ध करुन दिले जाते.

| अ.क्र. | योजनेचे नाव | योजनांचे स्वरुप | |
|---|---|---|---|
| १. | **राज्य महामंडळाची** २०% **बीज भांडवल योजना** | १. | राष्ट्रीयकृत बँका, जिल्हा अग्रणी बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातून राबविण्यात येते. |
| | | २. | महामंडळाचा सहभाग २०% |
| | | ३. | लाभार्थीचा सहभाग ५% व बँकांचा सहभाग ७५% असतो. |
| | | ४. | या योजनेमध्ये महत्तम प्रकल्प मर्यादा रु.५.०० लक्ष आहे |
| | | ५. | महामंडळाच्या कर्जावरील व्याजाचा दर ६% असून परतफेडीचा कालावधी ५ वर्ष आहे. |
| | | | |
| २. | **रु.१.०० लक्ष पर्यंतची थेट कर्ज योजना** | १. | शासनाकडून प्राप्त भागभांडवलातून महामंडळ ही योजना राबविते. |
| | | २. | रु.१.०० लक्ष पर्यंत थेट कर्ज उपलब्ध. |
| | | ३. | लाभार्थीचा सहभाग " निरंक " |
| | | ४. | ४८ समान मासिक हप्त्यांमध्ये मुद्दल रु.२,०८५/- नियमित परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारण्यात येणार नाही. |
| | | ५. | नियमित कर्जाची परतफेड न करणाऱ्या लाभार्थींना जेवढे कर्जाचे हप्ते थकीत होतील, त्या रक्कमेवर द.सा.द.शे. ४% व्याज आकारण्यात येईल. |
| | | | |
| ३. | **वैयक्तिक कर्ज व्याज परतावा रु.१०.०० लक्षपर्यंतची कर्ज योजना** | १. | शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदान रक्कमेतून महामंडळ ही योजना राबविते. |
| | | २. | बँकेकडून कर्ज मर्यादा रु.१० लक्ष पर्यंत. |
| | | ३. | बँकेने रुपये १०.०० लाखपर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजुर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२% च्या मर्यादेत) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपुर्णपणे संगणीकृत असुन सदर प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. व्यवसायाच्या स्वरुपानुसार बँकेमार्फत कर्ज रक्कम मंजूर करण्यात येईल. |
| | | ४. | कुटूंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल. |
| | | ५. | वेबपोर्टल / महामंडळाच्या संगणक प्रणालीवर नाव नोंदणी अनिवार्य. |
| | | ६. | कर्ज परतफेडीचा कालावधी — बँक निकषानुसार |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | **गट कर्ज व्याज परतावा योजना रु.१०.०० लक्ष ते रु.५०.०० लक्षपर्यंत** | १. | शासनाकडून प्राप्त सहाय्यक अनुदान रक्कमेतून महामंडळ ही योजना राबविते. |
| | | २. | बँकेकडुन प्रती गटास जास्तीत जास्त रु.५०.०० लक्षपर्यंतच्या मंजुर उद्योग उभारणीकरीता |
| | | ३. | पात्र शेतकरी उत्पादक (Farmers Producers Organaizations - FPO) गटांना रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज रक्कम उद्योगाकरीता देण्यात येईल. |
| | | ४. | योजना संपुर्णपणे संगणकीकृत असुन सदर प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. |
| | | ५. | मंजुर कर्जावर ५ वर्षापर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जे कमी असले ते, कर्ज मंजुर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि रु.१५.०० लाखाच्या मर्यादेत त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. |
| | | ६. | महामंडळ केवळ गटाने हप्ते वेळेवर भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यावरील योग्य व्याज रक्कम अदा करेल. |
| | | ७. | गटातील उमेदवारांनी महामंडळाच्या अधिकृत वेबपोर्टल वर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पात्र ठरत असल्यास गटास संगणकीकृत सशर्त हेतुपत्र (Letter of Intent) दिले जाईल. गटाने या आधारे बँकेकडुन प्रकरणावर कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल. |
| | | | |
| ५. | **शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना** | १. | राज्य, देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेले इतर मागासवर्ग प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थिनीना उच्च शिक्षणाकरीता बँकेमार्फत उपलब्ध शैक्षणिक कर्ज रक्कमेवरील व्याजाचा परतावा करणे. |
| | | २. | विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताच्या दृष्टीकोनातुन त्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करणे. शैक्षणिक व आर्थिकदृष्टया सक्षम करणे. |
| | | ३. | इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थी / विद्यार्थिनीना उच्च शिक्षणासाठी बँकेकडून राज्यांतर्गत व देशांतर्गत अभ्यासक्रमासाठी रु.१०.०० लक्ष व परदेशी अभ्यासक्रमासाठी रु.२०.०० लक्ष महत्तम कर्ज मर्यादेत वितरीत केलेल्या रक्कमेवरील कमाल १२% व्याज परतावा महामंडळमार्फत अदा करण्यात येईल. |
| | | ४. | विद्यार्थ्याचे वय १७ ते ३० वर्षे असावे व तो इमाव प्रवर्गातील, महाराष्ट्राचा रहिवाशी असावा. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५. | **<u>अभ्यासक्रम :-</u> १.** आरोग्य विज्ञान, **२.** अभियांत्रिकी, **३.** व्यावसायिक व व्यवस्थापन अभ्यासक्रम व **४.** कृषी, अन्नप्रक्रिया व पशुविज्ञान अभ्यासक्रम. |
| | | | **<u>अ. राज्यांतर्गत अभ्यासक्रम :-</u>** केंद्रीय परिषद, कृषी वि द्यापीठ परिषद, शासकीय अनुदानित व खाजगी मान्यताप्राप्त **<u>(NAAC मानांकन प्राप्त)</u>** शैक्षणिक संस्थेत अभ्यासक्रमासाठी शासनमान्य सामाईक पात्रता परीक्षा उत्तीर्ण झालेल्या व त्यानुसार प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी |
| | | | **<u>ब. देशांतर्गत अभ्यासक्रम</u> :- देशातील** नामांकित संस्थेत प्रवेश घेतलेले विद्यार्थी पात्र असतील. |
| | | | **<u>क.</u> परदेशी अभ्यासक्रमासाठी :-** QS (Quacquarelli Symonds) च्या रँकिंग / गुणवत्ता, पात्रता परीक्षा Graduate Record Exam (GRE), Test of English as a Foreign Language (TOEFL) उत्तीर्ण झालेले विद्यार्थी. |
| | | | ➢ शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये सक्षम प्राधिकरणाने / शासनाने बदल किंवा नवीन अभ्यासक्रम समविष्ट केल्यास त्यानुषंगाने बदल करण्याचे अधिकार महामंडळाच्या संचालक मंडळास असतील. |
| | | | |
| **६.** | **कौशल्य विकास प्रशिक्षण योजना** | | **उद्देश -** राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच, इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभा व्हावा तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन कौशल्यपूर्ण बनवणे व त्याद्वारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे. |
| | | | **प्रशिक्षण कार्य -** |
| | | १. | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाकडून योजनेची प्रभावी मांडणी व अंमलबजावणी बाबत MSSDS यांना सहाय्य करणे. |
| | | २. | प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत MSSDS च्या पोर्टलला महामंडळाच्या पोर्टलशी जोडणी करण्यात येईल. |
| | | ३. | महामंडळाकडुन सदर पोर्टलचे Login, Credential Custmised करुन घेण्यात येईल. |
| | | ४. | महामंडळ निवडक प्रशिक्षण कार्यक्रमाची निवड करुन त्याची अंमलबजावणी करेल. |
| | | ५. | समुपदेशन उपक्रम, असंघटित क्षेत्रातील काम कराणाऱ्या लोकांमध्ये जनजागृती आणि मार्गदर्शन कार्यक्रमास मदत व समर्थन करण्यासाठी MSSDS च्या जिल्हा यंत्रणेशी महामंडळाची जिल्हा यंत्रणा सहाय्य करील. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ६. | किमान इयत्ता १० वी पास व पुढील शिक्षण घेतलेले इतर मागास प्रवर्गातील युवकांना परंपरागत तसेच कौशल्य विकासासाठी कार्यरत असणाऱ्या व्यावसायिक/ शैक्षणिक संस्था यांना प्रोत्साहित करुन सहाय्य करणे हा सदर कार्यक्रमाचा उद्देश आहे. |
| | | | |
| ७. | **महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना**<br>शासन निर्णय क्र. इमाव २०१८/प्र.क्र.१०८/महामंडळे, दि.०७.०६.२०२२ नुसार योजनेस मान्यता प्राप्त झाली असून सदर योजना महामंडळ व माविमच्या समन्वयाने ऑनलाईन पध्दतीने कार्यान्वित करण्याची कार्यवाही सुरु आहे. | १. | इतर मागास प्रवर्गातील महिलांचे सक्षमीकरण करुन त्यांना स्वावलंबी व आत्मनिर्भर करणे. |
| | | २. | महिला बचत गटांना बँकांमार्फत वितरीत केलेल्या रु.५.०० ते रु.१०.०० लक्षपर्यंतच्या कर्ज रक्कमेवरील १२% व्याजाच्या मर्यादेत व्याज परतावा महामंडळाकडून देण्यात येईल. |
| | | ३. | सदर योजना ही ऑनलाईन पध्दतीने राबविण्यात येत आहे. |
| | | ४. | पात्र महिला बचत गटातील फक्त इतर मागासप्रवर्गाच्या महिला अर्जदारांना व्याज परतावा योजनेचा लाभ महामंडळाकडून देण्यात येईल. |
| | | ५. | महिला आर्थिक विकास महामंडळाच्या CMRC मार्फत शिफारस केलेल्या महिला बचत गटात किमान ५०% इतर मागास प्रवर्गातील महिला असतील असा बचत गट प्रथम टप्प्यात रु.५.०० लक्ष पर्यंतच्या गट कर्ज व्याज परतावा योजनेसाठी पात्र राहील. |
| | | ६. | प्रथम टप्प्यातील कर्ज नियमित परतफेडीनंतर सदर बचत गट द्वितीय टप्प्यात रु.१०.०० लक्ष पर्यंत कर्ज बँकेकडुन मंजुर करुन घेण्यास पात्र होईल. |
| | | ७. | महिला बचत गटातील महिला इतर मागास प्रवर्गातील व महाराष्ट्राची रहिवाशी असावी. |
| | | ८. | पात्र महिलांचे किमान वय १८ व कमाल वय ६० वर्षे राहील. |
| | | ९. | महामंडळामार्फत महिला बचत गटाच्या बँक खात्यामध्ये दर तिमाही व्याजाचा परतावा बँकेच्या मंजूरीनुसार ५ वर्षापर्यंतच्या कालावधीकरीता बँक प्रमाणिकरणानुसार अदा करण्यात येईल. |
| | | १०. | सदर योजना महिला आर्थिक विकास महामंडळाच्या लोकसंचालित साधनकेंद्र (CMRC) च्या सहाय्याने राबविण्यात येत आहे. |
| | | ११. | CMRC मार्फत प्राप्त झालेल्या प्रस्तावास महामंडळामार्फत पात्रता प्रमाणपत्र निर्गमित करण्यात येईल. |

**२. लाभार्थींची अर्हता -**

- अर्जदार इतर मागासवर्गीय असावा.
- तो महाराष्ट्राचा सर्वसाधारण रहिवाशी असावा.

**वयोमर्यादा —**

| योजनेचे नाव | | अर्जदाराचे वय | वार्षिक उत्पन्न |
|---|---|---|---|
| ▪ बीज भांडवल योजना | .... | १८ ते ५० वर्षे | रु. १.०० लक्ष पर्यत |
| ▪ थेट कर्ज योजना | .... | १८ ते ५५ वर्षे, | रु. १.०० लक्ष पर्यत |
| ▪ वैयक्तिक व्याज परतावा योजना | .... | १८ ते ५० वर्षे | रु. ८.०० लक्ष पर्यत |
| ▪ गट कर्ज व्याज परतावा योजना | .... | १८ ते ४५ वर्षे | रु. ८.०० लक्ष पर्यत |
| ▪ शैक्षणिक कर्ज योजना | .... | १७ ते ३० वर्षे | रु. ८.०० लक्ष पर्यत |
| ▪ कौशल्य विकास प्रशिक्षण योजना | .... | १८ ते ५० वर्षे | रु. ८.०० लक्ष पर्यत |
| ▪ महिला स्वयंसिध्दी व्याज परतावा योजना | .... | १८ ते ६० वर्षे | रु. ८.०० लक्ष पर्यत |

- तो कोणत्याही बँकेचा, महामंडळाचा किंवा वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.
- कुटुंबातील एकाच व्यक्तीस सदर योजनेचा लाभ घेता येईल.
- अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल, त्या व्यवसायाचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा.
- कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे राहतील.

३. ***कर्ज मागणी प्रस्तावासोबत जोडावयाच्या आवश्यक कागदपत्रांची यादी :-***

- सक्षम अधिका-याने दिलेला संपूर्ण कुटुंबाच्या वार्षिक उत्पन्नाचा दाखला.
- जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणित प्रत, पासपोर्ट साईज फोटो, फोटो ओळखपत्र (उदा. निवडणूक ओळखपत्र, आधार कार्ड)
- व्यवसाय स्थळाची भाडे पावती, करारनामा, ७/१२ उतारा
- अर्जदाराच्या शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र / जन्म तारखेचा दाखला
- स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत ***ना-हरकत प्रमाणपत्र***
- अर्जदाराला ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजूर होणार आहे, त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे अर्जदाराचे प्रतिज्ञापत्र.
- तांत्रिक व्यवसायासाठी जे परवाना / लायसन्स आवश्यक असतील असे परवाने / लायसन्स.
- व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, या अहवालासोबत लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादी बाबतचे दरपत्रक.
- सिबील पात्रता थेट कर्ज योजना व गट व्याज परतावा योजनांकरीता लागू राहील.

**सूचना : अर्जदाराने मुळ प्रमाणपत्र न जोडता त्याच्या स्व-साक्षांकित प्रती जोडाव्यात.**

## ब.	सेवा पुरविणारे अधिकारी - जिल्हा व्यवस्थापक

### महामंडळातील जिल्हा कार्यालयांचा तपशील

| अ. क्र. | जिल्हा | जिल्हा व्यवस्थापकांचे नाव | मोबाईल क्रमांक | दूरध्वनी क्रमांक | पत्ता व ईमेल आय.डी |
|---|---|---|---|---|---|
| १ | मुंबई शहर | श्री. पी.पी. पानसरे (अ.का.) | 9619445154 | 022-35597541 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आ र्थिक विकास महामंडळ, गृहनिर्माण भवन, तळ मजला, गाळा नं. ३३, कलानगर, बांद्रा, ( पुर्व), मुंबई-४०००५१ **dmobcmumbaicity@gmail.com** |
| २ | मुंबई उप | श्री. पी.पी. पानसरे | 9619445154<br>8656013326 | 022-35597541 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आ र्थिक विकास महामंडळ,गृहनिर्माण भवन, तळ मजला, गाळा नं. ३३, कलानगर, बांद्रा, ( पुर्व), मुंबई-४०००५१ **dmobcmumbaicity@gmail.com** |
| ३ | ठाणे | श्री. जी.व्ही. डोईफोडे (अ.का.) | 9821617890 | 022-20813625 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खारेगाव, कळवा, ठाणे पूर्व, पिन.४०० ६०३. dmobcthane@gmail.com |
| ४ | पालघर | श्री. एन.व्ही. नार्वेकर | 9869281787<br>9082320544 | 9869281787 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, आफरीन अपार्टमेंट, बी-विंग, फ्लॅट नं. १०६, पहिला मजला, नवली रेल्वे फाटक रोड, नवली पालघर पूर्व जिल्हा-पालघर, पिन-४०१४०४ **dmobcpalghar@gmail.com** |
| ५ | रायगड | श्री. आर.के. दरेकर (अ.का.) | 9320202033 | 02141-224448 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, श्री राम समर्थ को.हौ.सो.लि.रुम नं.१०१, पहिला मजला, चेंढरे, पो. अलिबाग, तालुका- अलिबाग, जिल्हा-रायगड-४०२२०१ dmobcraigad@gmail.com |
| ६ | रत्नागिरी | श्रीमती प्रिती आर. पटेल (अ.का.) | 8484904637 | 02352-228470 | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, (मधली इमारत), १ मजला, पाटबंधारे स्टॉप, कुंवारबाव, जिल्हा- रत्नागिरी-४१५६३९ dmobcratnagiri@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ७ | **सिंधुदूर्ग** | **श्रीमती प्रिती आर. पटेल** | **8484904637** | **02362-228119** | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,<br>अ-विंग, तळमजला, ता. कुडाळ,<br>जिल्हा सिंधुदूर्ग – ४१६ ८१२<br>dmobcsindhudurg@gmail.com |
| ८ | **पुणे** | **श्री. एस.जे. पाटील** | **9890521787** | **020-29523059** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, इमारत क्र. बी<br>स.नं.१०४/१०५, मेंटल हॉस्पीटल कॉर्नर, पोलीस चौकी समोर,<br>विश्रांतवाडी, येरवडा, पुणे ४११ ००६.<br>dmobcpune@gmail.com |
| ९ | **सातारा** | **श्री. पी.एन. दळवी** | **9405564214** | **02162-295184** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.<br>भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, २ रा मजला, सर्व्हे नं.२२/अ, जुनी MIDC रोड, बॉम्बे रेस्टॉरंट उड्डाण पूल, सातारा<br>जिल्हा – सातारा - ४१५००३.<br>dmsataraobc@gmail.com |
| १० | **सांगली** | **श्री. आर.के. दरेकर** | **9320202033** | **0233-2321513** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जुना बुधगांव रोड,<br>जिल्हा-सांगली-४१६५१६<br>dmobcsangli@gmail.com |
| ११ | **सोलापूर** | **श्रीम. व्ही.डी. लहारे** | **7588142894<br>8999525956** | **0217-2312595** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ३ रा मजला, ७ रस्ता, बिग बझार समोर,<br>जिल्हा- सोलापूर ४१३ ००३<br>dmobcsolapur@gmail.com |
| १२ | **कोल्हापूर** | **श्री. पी.एन. दळवी (अ.का.)** | **9405564214** | **0231-2653512** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,<br>डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,३ रा मजला, खोली क्र.१,<br>विचारे माळ, कावळा नाका (ताराराणी चौक), डॉ.बाबर हॉस्पिटल जवळ,<br>जिल्हा- कोल्हापूर -४१६००३<br>dmobckolhapur@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१३** | **नाशिक** | **श्री. एस.जी. तायडे** | **9890277821** | **0253-2236073** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, इमारत क्र. १, बी विंग, दुसरा मजला, नासर्डी, पुलाजवळ, नाशिक –पुणे रोड, नाशिक क्लब समोर, जिल्हा- नाशिक dmobcnashik@gmail.com |
| **१४** | **धुळे** | **श्री. जी.व्ही. डोईफोडे (अ.का.)** | **9821617890** | **02562-278497** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. , डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ए-विंग तळमजला सिंचन भवन मागे, साक्री रोड, जिल्हा- धुळे-४२४ ००१ dmobcdhule@gmail.com |
| **१५** | **जळगाव** | **श्री. एस.जी. तायडे (अ.का.)** | **9890277821** | **0257-2261918** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला मजला, रुम नं.४, मायादेवी मंदिरासमोर, महाबळ, जिल्हा –जळगांव-४२५००१ dmobcjalgaon01@gmail.com |
| **१६** | **अहिल्यानगर** | **श्री. बी.एस. भोसले** | **9850673864** | **0241-2450030** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, जिल्हा- **अहिल्यानगर** ४१४००१ dmobcahamadnagar@gmail.com |
| **१७** | **नंदुरबार** | **श्री. एस.जी. तायडे (अ.का.)** | **9890277821** | **02564-210062** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, १ ला मजला, टोकर तलाव रोड, जिल्हा परिषद समोर, जिल्हा-नंदुरबार-४२५४१२ dmobcnandurbar@gmail.com |
| **१८** | **छत्रपती संभाजीनगर** | **श्री. जे. झेड. राठोड** | **9422337927** | **0240-2341544** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, खोकडपुरा , २ रा मजला, शिवाजी हायस्कूलच्या बाजुला, जिल्हा-औरंगाबाद- ४३१ ००५ dmobcaurangabad2013@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **१९** | **जालना** | **श्री. ए.एस. कन्नडकर (अ.का.)** | **9850304000** | **02482-223420** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ए विंग, तळमजला, जिल्हाधिकारी कार्यालयासमोर, जिल्हा- जालना ४३१ २०३. dmobjalna@gmail.com |
| **२०** | **परभणी** | **श्री. ए.एस. कन्नडकर** | **9850304000** | **02452-227615** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जायकवाडी वसाहत, कारेगांव रोड, जिल्हा- परभणी ४३१४०१ dmobcparbhani@gmail.com |
| **२१** | **धाराशिव** | **श्रीम. व्ही.डी. लहारे (अ.का.)** | **7588142894 8999525956** | **02472-223863** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, मध्यवर्ती प्रशासकीय इमारती जवळ, औरंगाबाद रोड, जिल्हा-उस्मानाबाद-४१३५०१ dmobcosmanabad@gmail.com |
| **२२** | **बीड** | **श्री. बी.एस. भोसले (अ.का.)** | **9850673864** | **02442-232624** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय विश्रामगृहाच्या समोर, अहमदनगर रोड, जिल्हा – बीड -४३१ १२२ dmobcbeed@gmail.com |
| **२३** | **नांदेड** | **श्री. एस.एन.झुंजारे** | **9890039491** | **02462-220865** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, ग्यानमाता शाळेसमोर, विमानतळ रस्ता, नांदेड, जिल्हा-नांदेड- ४३१६०५ dmobcnanded@gmail.com. |
| **२४** | **लातूर** | **श्री. एस.एन.झुंजारे (अ.का.)** | **9890039491** | **02382-253334** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, १ ला मजला, जात पडताळणी इमारत, शिवनेरी गेट समोर, जिल्हा- लातूर-४१३५१२ dmobclatur01@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २५ | **हिंगोली** | **श्री. एस.एन.झुंजारे (अ.का.)** | **9890039491** | **02456-224442** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, २ रा मजला,चिराग शहा दर्गा रोड, हिंगोली. जिल्हा- हिंगोली ४३१ ५१३ dmobchingoli@gmail.com |
| २६ | **अमरावती** | **श्रीम. व्ही.एस.खोडे (अ.का.)** | **7875866298** | **0721-2550339** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, तळ मजला, पोलीस आयुक्तालयाजवळ, कॅम्प ऐरिया, जिल्हा – अमरावती ४४४७०२ dmobcamravati@gmail.com |
| २७ | **बुलडाणा** | **श्री. एस.एम.राठोड** | **8108852056** | **07262-248285** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, पहिला मजला, त्रिशरण चौक, चिखली रोड, जिल्हा-बुलढाणा-४४३ ००१ dmobcbuldana@gmail.com |
| २८ | **यवतमाळ** | **श्री. एस.के बेझलवार (अ.का.)** | **7758866696** | **07232-243052** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,<br>पोलीस वसाहतीच्या मागे,दारव्हा रोड, यवतमाळ,<br>जिल्हा- यवतमाळ ४४५ ००१. dmobcyavatmal@gmail.com |
| २९ | **अकोला** | **श्री. जे. झेड. राठोड (अ.का.)** | **9422337927** | **0724-2410221** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., जिल्हा कार्यालय-द्वारा-किरण देशमुख, ३ री गल्ली, तापडीया नगर, जिल्हा-अकोला-४४४००१ dmobcakola30@gmail.com |
| ३० | **वाशिम** | **श्री. एस.एम.राठोड (अ.का.)** | **8108852056** | **07252-231665** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन,<br>चिखली रोड, जिल्हा -वाशिम-४४४५०५ dmobcwashim@gmail.com |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **३१** | **नागपूर** | **श्री. एस.के बेझलवार** | **7758866696** | **0712-2956086** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, बी विंग, ३०३, ३ रा मजला, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, दिक्षाभूमी जवळ, श्रध्दानंद पेठ, जिल्हा- नागपूर-४४००२२ dmobcnagpur@gmail.com |
| **३२** | **वर्धा** | **श्रीम. व्ही.एस.खोडे** | **7875866298** | **07152-232881** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेवाग्राम रेल्वे स्टेशन रोड, जिल्हा-वर्धा-४४२००१ dmobcwardha40@gmail.com |
| **३३** | **भंडारा** | **श्रीम.व्ही.व्ही. फडणवीस** | **9689178773** | **9665278074** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, २ रा मजला, सिव्हील लाईन, जिल्हा परिषद चौक, जिल्हा- भंडारा-४४१ ९०४. dmobcbhandara@gmail.com |
| **३४** | **चंद्रपूर** | **श्रीम.के.के.सातपुते** | **9545894833** | **07172-262420** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जलनगर, जिल्हा- चंद्रपूर-४४२४०१ dmobcchandrapur@gmail.com |
| **३५** | **गोंदीया** | **श्रीम.व्ही.व्ही. फडणवीस (अ.का.)** | **9689178773** | **07182-234037** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, जिल्हाधिकारी कार्यालयामागे, पतंगा चौक, जिल्हा- गोंदिया-४४१६१४ dmobcgondia@gmail.com |
| **३६** | **गडचिरोली** | **श्री. के.के. सातपुते (अ.का.)** | **9545894833** | **07132-223024** | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या., डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, आय.टी.आय च्या मागे कॉम्प्लेक्स, जिल्हा- गडचिरोली-४४२ ६०५. **dmobcgadchiroli@gmail.com** |

महामंडळाची  पालघर, ठाणे, रायगड व अकोला वगळता सर्व जिल्हा कार्यालये संबंधीत जिल्हयाच्या ठिकाणी  डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन मध्ये कार्यरत आहेत.

## क.  सेवा पुरविण्याची कार्यपध्दती व कालावधी :

१. इतर मागासवर्गीय प्रवर्गातील व्यक्तींना/लाभार्थींना ऑफलाईन पद्धतीच्या योजनेत विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्ज महामंडळाच्या जिल्हा कार्यालयातून आवश्यक शुल्क आकारुन उपलब्ध केले जातात. तसेच ऑनलाईन योजनेची नोंदणी महामंडळाद्वारा विकसीत संबंधीत योजनेच्या पोर्टलवर करता येते.

२. विहित नमुन्यातील कर्ज मागणी अर्जासह आवश्यक कागदपत्रे जोडून अर्जदार कर्ज मागणी प्रस्ताव जिल्हा कार्यालयामध्ये दाखल करतात. सदर कर्जप्रस्तावांची व त्यासोबतच्या कागदपत्रांची तपासणी जिल्हा व्यवस्थापक यांचेमार्फत केली जाते.  प्राप्त कर्ज प्रस्तावांना विजाभज इमाव व विमाप्र कल्याण विभाग, शासन निर्णय परिपत्रक क्र.इमाव-२०१९/प्र.क्र.४०/महामंडळे, दि.०६.०७.२०१९ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या जिल्हा लाभार्थी निवड समितीची मान्यता घेण्यात येते.  जिल्हा लाभार्थी निवड समितीमध्ये खालीलप्रमाणे सदस्यांचा समावेश असतो.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | जिल्हाधिकारी | :: | अध्यक्ष |
| २. | जिल्हा सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण | :: | सदस्य |
| ३. | जिल्हा अग्रणी बँक अधिकारी | :: | सदस्य |
| ४. | प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था (संबंधीत जिल्हा) | :: | सदस्य |
| ५. | कौशल्य विकास अधिकारी | :: | निमंत्रक |
| ६. | महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक | :: | सदस्य सचिव |

**जिल्हा लाभार्थी निवड समितीची कार्यप्रणाली खालीलप्रमाणे असेल :-**

१. जिल्हा लाभार्थी निवड समितीमार्फत २०% बीज भांडवल, रु.१.०० लक्षपर्यंतची थेट कर्ज योजना व शैक्षणिक व्याज परतावा योजनेतील लाभार्थींची निवड करण्यात येईल.

२. महामंडळाच्या जिल्हास्तरीय कार्यालयातून संपूर्ण कार्यवाही केली जाईल.

३. महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

४. महामंडळाचे जिल्हा कार्यालयाकडून जिल्हा माहिती अधिकाऱ्यांमार्फत महामंडळाच्या योजनांची माहिती  स्थानिक वर्तमानपत्रातून विनामूल्य  प्रसिध्द करण्यात येते  व प्रमुख शासकीय / निमशासकीय

कार्यालयामधील नोटीस महामंडळाच्या योजनांची माहिती बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल व त्याचवेळी महामंडळाच्या कार्यालयात अर्जाचा नमुना व कागदपत्रांची सुची सर्वांना पाहण्यासाठी उपलब्ध करतील.

५. विहित मुदतीत महामंडळाने निर्देशित केलेल्या आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यात आलेल्या योजनांचे योजनानिहाय अर्ज Online तसेच Offline पध्दतीने स्विकारण्यात येतील.

६. राज्य शासनाच्या योजनेंतर्गत कर्ज मागणी अर्जाची मुदत त्या संबंधीत आर्थिक वर्षासाठीच असेल (दि.०१ एप्रिल ते ३१ मार्च), प्रत्येक वर्षासाठी नव्याने जाहिरात प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, त्या आर्थिक वर्षात प्राप्त झालेली संपूर्ण प्रकरणे वेळोवेळी मंजूर करण्याची जबाबदारी समितीची असेल,

७. महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक हे समितीचे सदस्य सचिव असल्याने प्राप्त अर्जांची संपूर्ण छाननी / तपासणी करुन पात्र व अपात्र लाभार्थींची यादी तयार करतील. यासाठी पुढील बाबी विचारात घेणे अनिवार्य राहील.

अ) उद्योग / व्यवसायाची वर्धनक्षमता,

आ) लाभार्थ्यांची सक्षमता / व्यवसायाचे ज्ञान,

इ) परतफेडीची क्षमता / जामिनदारांची क्षमता,

८. कर्ज मंजूरी प्रकरणातील आर्थिक वर्षात कार्यवाही पूर्ण करणे आवश्यक असल्याने वेळोवेळी लाभार्थी निवड समितीच्या बैठका घेण्यात येतील. समितीच्या प्रत्येक बैठकीत मागील बैठकीतील मंजूर कर्ज प्रकरणांचा आढावा घेण्यात येईल.

९. जिल्हाधिकारी यांना सार्वत्रिक निवडणुका, कायदा व सुव्यवस्था, नैसर्गिक आपत्ती, टंचाई परिस्थितीच्या कामकाजामुळे बैठक घेणे शक्य नसल्यास विशिष्ट परिस्थितीत उप जिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) किंवा निवासी उप जिल्हाधिकारी हे बैठक घेतील.

१०. समितीने मंजूर केलेल्या प्रकरणात स्थानिक बँकांकडून लाभार्थ्यांना कर्जाचे वितरण वेळेत करण्यास ज्या बँकांकडून विलंब होत आहे, अशा बँकांच्या व्यवस्थापनाच्या प्रतिनिधींना बैठकीस बोलावून तातडीने कार्यवाही करण्याबाबत सूचना देण्यात येतील.

## ड. सेवा मुदतीत न पुरविल्यास तक्रार करावयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याचे नाव व हुद्दा

जिल्हा कार्यालयांकडे प्राप्त झालेल्या कर्ज प्रस्तावांची तपासणी एक महिन्याच्या आत न झाल्यास व जिल्हा लाभार्थी निवड समितीने मंजूर केलेले कर्ज प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी बँक / महामंडळाच्या मुख्यालयाकडे एक महिन्याच्या आंत न पाठविल्यास त्याबाबत व्यवस्थापकीय संचालक यांचेकडे तक्रार दाखल करता येते. त्यांचा पत्ता खालीलप्रमाणे आहे :-

**व्यवस्थापकीय संचालक,**

**महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्या.,**

**प्रशासकीय भवन, ४ था मजला, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई - ४०० ०७१.**

**दूरध्वनी : ०२२ – २५२७ ५३७४ / २५२९ ९६८५**

**वेबसाईट : www.msobcfdc.org** **ई-मेल – mdmsobcfdc@gmail.com**
**homsobcfdc@gmail.com**

************

दिनांक – २४ मार्च, २०२१.

सादर :

विषय : माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत प्रसिध्द करावयाची १७ मुद्दयांची माहिती व नागरीकांची सनद बाबत-

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, दरवर्षी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्रसिध्द करावयाची १७ मुद्दयांची माहिती व नागरीकांची सनद अद्यावत करुन मुख्यालयात दर्शनी भागात ठेवण्याकरीता तसेच महामंडळाच्या वेबसाईटवर अपलोड करणे आवश्यक आहे.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत प्रसिध्द करावयाची १७ मुद्दयांची माहिती व नागरीकांची सनद, २०२१ हया दोन विषयांची माहिती मुख्यालयातील प्रकल्प, प्रशासन व लेखा विभागामार्फत अद्यावत करण्यात आली आहे.

तरी, सदर माहितीचा अधिकारांतर्गतची माहिती व  नागरीकांची सनद, २०२१ यांचा प्रत्येकी एक संच मुख्यालयात दर्शनी भागात ठेवण्याकरीता व महामंडळाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यास मान्यता असावी.

मान्यतेकरीता सादर.

सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रशासन)

सहाय्यक महाव्यवस्थापक (प्रकल्प)

उपमहाव्यवस्थापक (प्रकल्प)

मुख्य वित्तीय अधिकारी (अ.का.)

महाव्यवस्थापक (अ.का.)

व्यवस्थापकीय संचालक